# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०३/२०२०

| | | |
|---|---|---|
| श्री.रविंद्र शामराव कदम | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्सि. ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली.<br>२. डॉ.व्ही.पी. शेतकरी शिक्षण मंडळ, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्सि. ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली. | } | वि. प. |

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्सि. ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली यांचेकडील शिक्षक श्री. रविंद्र शामराव कदम यांनी दि.०३/११/२०२० रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी दिनांक ०९/०९/१९९१ पासून सहायक प्राध्यापक म्हणून सेवेत असून दिनांक ०९/९/१९९९ पासून सहयोगी प्राध्यापक म्हणून सेवेत आहे. दिनांक ०९/०९/२००२ रोजी मला सिलेक्शन ग्रेड मंजूर झाली आहे.

१.दिनांक ०१/१२/२०१८ पासून मला आज अखेर वेतन अदा केलेले नाही.

२.दिनांक ०१/०४/२०१८ रोजी ते ३०/११/२०१८ या कालावधी मधील महागाई भत्ता केवळ ६२ टक्के असा केला तो १४२ टक्के प्रमाणे देणे आवश्यक आहे इतर सेवकांना तो १४२ टक्के प्रमाणे दिला मात्र मला दिला नाही.

३.सन २०१२-१३ पासून आजअखेर मला वेतनवाढ देणेत आली नाही.

वरीलप्रमाणे माझ्यावर संबधित व्यवस्थापनाने अन्याय केला आहे. तरी शासन दराने सर्व भत्त्यासह वेतन व वेतनवाढी मागील फरकासह व ९ टक्के व्याजासह अदा करण्याबाबत संबधित व्यवस्थापनास आदेश व्हावेत.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१.श्री.रविंद्र शामराव कदम यांची मा.पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, पुणे येथे अपिल नं. ९२/२०२० च्या स्वरूपात केस प्रलंबित आहे.

२.श्री.रविंद्र शामराव कदम यांनी वर नमुद केल्याप्रमाणे दाखल केले अपिलाबाबतची माहिती आपल्या गाऱ्हाणा समितीपासून लपवून ठेवली आहे.

३.श्री.रविंद्र शामराव कदम यांना आपल्या विद्यापीठाच्या निवड समितीच्या अहवालानुसार त्यांच्या कायम नियुक्तीस आपल्या विद्यापीठाने दि.११ ऑक्टोंबर २००७ च्या आदेशाने मान्यता नाकारली आहे. श्री. रविंद्र शामराव कदम हे ॲप्रुव्हड शिक्षक नसल्याने आपल्या गाऱ्हाणा समितीसमोर कोणत्याही प्रकारची तक्रार ते करू शकत नाहीत व त्यांना तसा अधिकारच नाही. त्यामुळे श्री.कदम यांचा तक्रार अर्ज चालण्यास पात्र नसल्याने दप्तरी दाखल करावा.

४.आमचे पी.व्ही.पी.आय.टी महाविद्यालय हे कायम विनाअनुदानित आहे. त्यामुळे तेथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जे वेतन द्यावे लागते ते महाविद्यालयाकडील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या फी मधून अदा करावे लागते. वेतन किती द्यायचे, महागाई भत्ता किती दराने द्यायचा हा सर्व अधिकार संस्था व महाविद्यालयाच्या गर्व्हनिंग बॉडीला आहे. श्री.कदम यांना जे वेतन व भत्ते दिलेले आहे ते इतर शिक्षकांना ज्या दराने दिले आहे त्याप्रमाणे दिलेले असल्याने केलेली मागणी चुकीची आहे.

५.श्री.कदम यांनी ते ज्या पदावर काम करीत होते. त्या पदाची शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नसल्याने त्यांना दि.०२/११/२०२० च्या आदेशाने सेवेतून कमी केलेले आहे व त्यांना यापुढे लॅब असिस्टंट पदावर नियुक्ती दिलेली असतानाही ते कामावर हजर राहून त्या पदाचे काम करीत नाहीत. त्यामुळे श्री.कदम हे आपल्याकडे दाद मागणेस पात्र नाहीत.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात दि.०१/१२/२०१८ पासून अर्ज दाखल दिनांकापर्यंत म्हणजेच दि.०३/११/२०२० पर्यंतचे वेतन अदा केलेले नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत संस्था, महाविद्यालयाने दिलेल्या लेखी खुलाश्यामध्ये श्री.रविंद्र शामराव कदम यांची मा.पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, पुणे येथे अपिल नं. ९२/२०२० च्या स्वरूपात केस प्रलंबित आहे. तसेच श्री. कदम यांना आपल्या विद्यापीठाच्या निवड समितीच्या अहवालानुसार त्यांच्या कायम नियुक्तीस आपल्या विद्यापीठाने दि.११ ऑक्टोंबर २००७ च्या आदेशाने मान्यता नाकारली आहे. श्री. कदम हे ॲप्रुव्हड शिक्षक नसल्याने समितीसमोर कोणत्याही प्रकारची तक्रार ते करू शकत नाहीत व त्यांना तसा अधिकारच नाही. त्यामुळे श्री.कदम यांचा तक्रार अर्ज चालण्यास पात्र नसल्याने म्हटले आहे. श्री.कदम

यांनी ते ज्या पदावर काम करीत होते. त्या पदाची शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नसल्याने त्यांना दि.०२/११/२०२० च्या आदेशाने सेवेतून कमी केलेले आहे व त्यांना यापुढे लॅब असिस्टंट पदावर नियुक्ती दिलेली असतानाही ते कामावर हजर राहून त्या पदाचे काम करीत नाहीत. त्यामुळे श्री.कदम हे आपल्याकडे दाद मागणेस पात्र नाहीत असे नमूद केले आहे.

तक्रारदार यांनी सेवा समाप्तीबाबत मा.पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, पुणे येथे अपिल नं. १२/२०२० ने दाद मागितली आहे. तक्रार निवारण समितीकडील मागण्या व मे. न्यायाधीकरण, पुणे यांचेकडील मागण्या भिन्न असल्याचे दिसून येते. सबब तक्रारदार यांच्या समितीकडील मागण्या विचारार्थ घेण्यात आल्या.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जात दि.०१/१२/२०१८ पासून अर्ज दाखल तारखेपर्यंत म्हणजेच दि.०३/११/२०२० पर्यंतचे वेतन अदा केलेले नाही अशी तक्रार केली आहे. तक्रारदार यांचे दि.०१/१२/२०१८ पुर्वीचे वेतन नियमित सुरू होते असे दिसून येते. तथापि दि.०१/१२/२०१८ पासून पुढे तक्रारदार यांचे वेतन कोणत्या कारणात्सव रोखण्यात आले याबाबत संस्था व महाविद्यालयाने कोणतेही सबळ कारण अथवा माहिती समितीसमोर सादर केलेली नाही. तक्रारदार हे दि.०१/१२/२०१८ ते दि.०३/११/२०२० या कालावधीत संस्था, महाविद्यालयाच्या सेवेत होते ही बाब संस्था व महाविद्यालयाने अमान्य केलेली नाही. त्यामुळे संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांचे सदर कालावधीतील वेतन विनाकारण रोखण्यात आलेले आहे असे समितीच्या निदर्शनास येते. सबब या कालावधी मधील तक्रारदार यांचे रोखण्यात आलेले वेतन संस्था, महाविद्यालयाने त्यांना अदा करणे आवश्यक आहे.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात दि. ०१/०४/२०१८ ते ३०/११/२०१८ या कालावधी मधील महागाई भत्ता केवळ ६२ टक्के असा केला तो १४२ टक्के प्रमाणे देणे आवश्यक आहे इतर सेवकांना तो १४२ टक्के प्रमाणे दिला मात्र मला दिला नाही.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या लेखी खुलाश्यामध्ये सदर महाविद्यालय हे कायम विनाअनुदानित आहे. त्यामुळे तेथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जे वेतन द्यावे लागते ते महाविद्यालयाकडील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या फी मधून अदा करावे लागते. वेतन किती द्यायचे, महागाई भत्ता किती दराने द्यायचा हा सर्व अधिकार संस्था व महाविद्यालयाच्या गर्व्हनिंग बॉडीला आहे. श्री.कदम यांना जे वेतन व भत्ते दिलेले आहे ते इतर शिक्षकांना ज्या दराने दिले आहे त्याप्रमाणे दिलेले असल्याने केलेली मागणी चुकीची आहे.

याबाबत समितीचे मत असे की, तक्रारदाराने इतर शिक्षक/कर्मचाऱ्यांना संस्था व महाविद्यालयाने १४२ टक्के महागाई भत्ता दिला हे दर्शविणारा कोणताही पुरावा या समितीपुढे मांडलेला नाही. उलटपक्षी संस्था व महाविद्यालयाने तक्रारदारांना जे वेतन व भत्ते दिलेले आहेत ते इतर शिक्षकांना ज्या दराने दिलेले आहेत त्या

प्रमाणे दिले असल्याचे स्पष्ट केलेले आहे. संस्था व महाविद्यालय हे कायम विना अनुदानित आहेत त्यामुळे वेतन किती द्यावयाचे, महागाई भत्ता किती दराने द्यावयाचा याचा अधिकार संस्था व महाविद्यालयाच्या गव्हर्निंग बॉडीला आहे असे वि.प. चे म्हणणे आहे. ते म्हणणे तक्रारदाराने खोडून काढलेले नाही. महाविद्यालयाने व संस्थेने भेदभाव केला आहे ही बाब तक्रारदाराने शाबित केलेली नाही. सबब तक्रारदाराची ही मागणी मान्य करता येत नाही.

३. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये सन २०१२-१३ पासून आज अखेर मला वेतनवाढ देणेत आली नाही असे नमूद केले आहे.

या तक्रारीबाबत संस्था व महाविद्यालयाने कोणतेही म्हणणे समितीसमोर दाखल केलेले नाही. सबब तक्रारदार यांच्या सन २०१२-१३ ते अर्ज दाखल दिनांकापर्यंत नियमानुसार देय असणाऱ्या वेतनवाढी त्यांना अदा करणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. करिता समिती खालील प्रमाणे आदेश करित आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांचे दि.०१/१२/२०१८ पासून अर्ज दाखल तारखेपर्यंत म्हणजेच दि.०३/११/२०२० पर्यंतचे रोखलेले वेतन व त्यास नियमानुसार देय असणाऱ्या महागाई भत्त्यासहित आदेश प्राप्त झालेच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत त्वरीत अदा करावे.

२. तक्रारदार यांची महागाई भत्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

३. संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांना सन २०१२-१३ पासून अर्ज दाखल तारखेपर्यंत नियमानुसार देय असणाऱ्या वेतनवाढी आदेश मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत अदा कराव्या.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

दिनांक : 06 APR 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

Ahkalekar
(सदस्य)
डॉ. के. एच. कोलेकर

सदस्य
(श्री. एस.यु.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम )

(प्रा. हंगिरगेकर राम.पी.)